आयएमएसची उद्योजकता परिषद

# उदासीन औद्योगिक धोरणामुळे राज्यातील निम्मे कारखाने बंद!

- चंद्रकांत साळुंखे

नगर, ता.२५- 'उद्योजकांचे प्रश्न सोडविण्याची मानसिकता महाराष्ट्र शासनाची नसल्याने आजमितीला राज्यातील १ लाख ६५ हजार लहान-मोठ्या उद्योगांपैकी ५० टक्के उद्योग बंद पडले आहेत! राज्याच्या उद्योग विभागाच्या बैठकांमध्ये गेल्या २२ वर्षांपासून तेच तेच विषय चर्चिले जातात. मात्र कोणताही निर्णय होत नाही. राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी उद्योगविषयीचे आपले धोरण जाहीर करावे. या संदर्भात स्मॉल ॲण्ड मिडियम बिझनेस चेंबर ऑफ इंडियातर्फे जाबही विचारण्यात येणार असल्याची माहिती चेंबरचे अध्यक्ष चंद्रकांत साळुंखे यांनी पत्रकारांशी वार्तालाप करताना दिली.

येथील आयएमएस या संस्थेत नव्याने स्थापन झालेल्या उद्योजकता विकास केंद्रातर्फे आज (ता.२५) हॉटेल यश ग्रॅण्ड येथे आयोजित जिल्हा उद्योजक परिषदेसाठी ते नगरला आले होते.

परिषदेस डॉ.भा.पां.हिवाळे एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन डॉ.एन.एम.ॲस्टन, मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या नगर शाखेचे अध्यक्ष अरविंद पारगावकर, 'आमी' संघटनेचे अशोक सोनवणे, ब्लस्टर इंजिनिअरिंगचे कारभारी भिंगारे आदि उपस्थित होते.

उद्योजक परिषदेत बोलताना साळुंखे यांनी आपल्या भाषणात आयएमएस संस्था तसेच स्मॉल ॲण्ड मिडीयम बिझनेस चेंबर ऑफ इंडिया यांच्यातील करारानुसार आय.एम.एस.संस्था (नगर) येथे विद्यार्थ्यांना उद्योजकतेचे शिक्षण घेता येईल, असे सांगितले.

परिपूर्ण उद्योजक निर्माण व्हावेत यासाठी सर्व सहकार्य व प्रशिक्षण व्यवस्था उपलब्ध करण्यात आली आहे. केवळ शिक्षणच नव्हे तर नगर शहर व जिल्ह्यातील औद्योगिक विकास इतर जिल्ह्यांच्या तुलनेत ठप्प का झाला आहे? याचा अभ्यास करुन ते सोडविण्यासाठी स्थानिक उद्योजकांच्या मदतीने राज्य व राष्ट्रीय पातळीवर चेंबरमार्फत प्रयत्न करण्यात येतील, असेही श्री.साळुंखे यांनी सांगितले.

स्थानिक उत्पादनांना योग्य बाजारपेठ मिळावी तसेच उद्योजकांना चेंबरतर्फे देशात विविध ठिकाणी आयोजित सेमिनार व प्रदर्शनांना उपस्थित राहून अनुभव मिळावा यासाठी आयएमएस संस्थेच्या पत्राद्वारे वर्षभर मोफत प्रवेशाची सुविधा उपलब्ध करण्यात येणार असल्याचे श्री.साळुंखे म्हणाले.

कार्यक्रमात नगरमधील उद्योजक हरजितसिंग वधवा व राजू गोरे यांनी जिल्ह्यातील औद्योगिक व इतर माहिती विषद केली.

आयएमएस संस्थेचे सरसंचालक प्रा.डॉ.शरद कोलते यांनी प्रास्तविकात उद्योजकता परिषद आयोजनामागील हेतू विषद केला. संचालक डॉ.एम.बी.मेहता यांनी स्वागत केले.

जिल्ह्याच्या उद्योजकता विकासात योगदान देणारे उद्योजक सर्वश्री सतीश गवळी, मधुकर शिंदे, दीपक लांडगे, सौ.कविता जाधव-बिडवे, श्रीमती जया औटी, मधुबाला चोरडीया, सौ.मंदा निमसे, संजय पारनाईक, मिलिंद कुलकर्णी यांचा मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

परिषदेच्या उद्घाटन कार्यक्रमावेळी जिल्ह्यातील उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा.ऋचा तांदूळवाडकर यांनी केले. प्रा.मीरा कुलकर्णी यांनी आभार मानले.

नंतर पत्रकारांशी बोलताना श्री. साळुंखे यांनी देशातील उद्योग क्षेत्रात महाराष्ट्र आघाडीवर असल्याचा दावा राज्याचे मुख्यमंत्री करतात परंतु तो फोल आहे. आकडेवारीसह तो त्यांनीच सिध्द करावा असे आव्हानात्मक विधान केले.

उद्योगांसाठी पोषक वातावरण नसल्याने उद्योजक कर्नाटक, गुजराथ, मध्यप्रदेश या राज्यात जात आहेत. राज्यातील उद्योग बंद का पडत आहेत? याचा अभ्यास कोणी करणार आहे का? असा सवाल श्री.साळुंखे यांनी केला.

परदेशी उद्योग राज्यात येत असेल तर शासन त्यांच्याकडे रेड कार्पेट अंथरते, सवलतींचा वर्षाव करते! परदेशी उद्योग आले पाहिजेत याबाबत दुमत नाही परंतु या परदेशी कंपन्यांनी त्यांच्या कामांपैकी २० टक्के कामे ही स्थानिक उद्योजकांकडून केल्यास येथील रोजगार वाढण्यास मदत होईल. मात्र त्याकडे शासन लक्ष देत नाही, अशी खंत श्री.साळुंखे यांनी पत्रकारांजवळ व्यक्त केली.

समाचार दि० २६ जुलै २०१४